बीड । महाराष्ट्र
मंगळवार दि. ०३ मार्च २०२६
वर्ष ५ वे । अंक ३३१
पान १ । पाने ४
किंमत ३ रूपये

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे । मो. : 9822152955
E-mail : dailymarathwadapatra2021@gmail.com

RNI/MAHMAR/2021/80074 | Post : Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-27 | https://marathwadapatra.com | https://epaper.marathwadapatra.com










# आणखी एक न्यायालयीन लढाईत धनंजय मुंडेंचा विजय

# लोकायुक्तांचा निकालही धनंजय मुंडेंच्या बाजूने



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे माजी मंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते आ. धनंजय मुंडे यांचा आणखी एका न्यायालयीन लढाईत विजय झाला असून, कृषी साहित्य खरेदी, ऑफिस ऑफ प्रॉफिट यासह वेगवेगळ्या आरोप करणाऱ्या अंजली दमानिया यांचे सर्व आरोप राज्य लोक आयुक्तांनी फेटाळून लावले आहेत.

धनंजय मुंडे हे राज्याचे कृषिमंत्री असताना एकात्मिक कापूस, सोयाबीन व इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्यसाखळी योजनेंतर्गत विशेष कृती कार्यक्रम राबवून त्याअंतर्गत नॅनो खते, कापूस बॅग, बॅटरी ऑपरेटेड स्प्रे पंप आदी साहित्य खरेदी करण्यात आले, त्यामध्ये अनियमितता करून शेकडो कोटी रुपयांचा अपहार केल्याचा आरोप अंजली दमानिया यांनी केला होता. या संदर्भात माननीय मुंबई उच्च न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्या बाजूने निकाल दिला व संबंधितांचे आरोप फेटाळून लावल्यानंतर अंजली दमानिया यांनी राज्य लोक आयुक्तांकडे याबाबत तक्रार केली होती.

लोकायुक्त यांनी दोन्ही बाजूंचे म्हणणे संपूर्णतः ऐकून घेऊन, सर्वोच्च न्यायालयाचे विविध निकाल तसेच संविधानिक तरतुदींचा अभ्यास करून माननीय मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल हा स्वयंस्पष्ट असून या प्रकरणातील आरोपांमध्ये कोणतेही तथ्य नसून सदर आरोप फेटाळून लावत असल्याचे आपल्या निकालामध्ये स्पष्ट केले आहे. उच्च न्यायालयाने धनंजय मुंडे यांच्या विरोधातील पडगिलवार ▶▶ उर्वरित पान २ वर

**● महत्त्वाचे निकाल...**

- कृषी मंत्री असताना कृषी साहित्य खरेदीबाबत करण्यात आलेल्या आरोपात उच्च न्यायालय त्यापाठोपाठ आता लोकायुक्त यांनी देखील मुंडेंच्या बाजूने निकाल दिला.
- पीकविमा संदर्भात कोणताही घोटाळा झाला नसून राज्यात मागील दहा वर्षातील सर्वाधिक पीकविमा धनंजय मुंडे यांच्या कृषिमंत्री कार्यकाळात महाराष्ट्राला मिळाला, असे स्वतः मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळ सभागृहात घोषित केले.
- धनंजय मुंडे यांनी निवडणूक आयोगाला विधानसभा निवडणुकीत आपल्या शपथ पत्रात चुकीची माहिती दिल्याच्या आरोपातून क्लीन चीट, मुंडेंच्या बाजूने निकाल.
- ऑफिस ऑफ प्रॉफिट संदर्भाने केलेले आरोप पूर्णपणे खोटे असल्याचे आजच्या निकालाने स्पष्ट झाले.

● अंजली दमानियांचे सर्वच आरोप लोकायुक्तांनी लावले फेटाळून

● कृषी साहित्य खरेदीबाबतचा उच्च न्यायालयाचा निकाल स्वयंस्पष्ट ; लोकायुक्तांचे निरीक्षण

● कृषी साहित्य खरेदी, ऑफिस ऑफ प्रॉफिट सह दमानियांचे सर्व आरोप लोकायुक्तानी फेटाळले

● तोंडाच्या वाफा काढत मुंडेंची बदनामी करणाऱ्या अंजली दमानियांना उच्च न्यायालया पाठोपाठ लोकायुक्तांकडून चपराक

● धनंजय मुंडेंवर लावलेले सर्व आरोप न्यायव्यस्थेपुढे ठरले खोटे

# शेतकऱ्यांच्या आत्महत्येस जबाबदार शेतकरी विरोधी कायद्यांची होळी

**शेतकरी विरोधी सरकारच्या नावाने बोंबा ठोकल्या ; एनडीपीएस कायद्यांतर्गत बदल करून शेतकऱ्यांना गांजा, अफु, तंबाखू लागवडीस परवानगी द्या : डॉ.गणेश ढवळे**



**बीड । प्रतिनिधी**

एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारत देशात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन त्यात महाराष्ट्र राज्यात ३८.५ टक्के प्रमाण असुन महाराष्ट्र पहिल्या स्थानावर आहे. मराठवाड्यात गेल्या सन २०२५ वर्षात ११२९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असुन बीड जिल्ह्यात २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नव वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी आत्महत्यांची नोंद आहे. सरकारच्या शेतकरी विरोधी धोरणांमुळे आणि शेतकरी विरोधी कायद्यांमुळे आत्महत्यांचे प्रमाण वाढले आहे.याच्या निषेधार्थ आणि शेतकऱ्यांचे आर्थिक जिवनमान उंचावत शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी एनडीपीएस कायद्यात बदल करून शेतकऱ्यांना गांजा,अफु, ▶▶ उर्वरित पान २ वर

## सोळा गुंठे जमीन प्रकरणी उच्च न्यायालयाचा आदेश ; मावेजा न दिल्याने अवमान याचिका दाखल



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेविरोधात सोळा गुंठे जमीन रस्त्यामध्ये गेल्याच्या प्रकरणी माननीय उच्च न्यायालय, संभाजीनगर खंडपीठाने जमीनमालकांच्या बाजूने निकाल देत नगरपालिकेला सहा आठवड्यांच्या आत मावेजा अदा करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. संबंधित जमीन नवनाथ शिराळे व गोरख शिराळे यांच्या वडिलांची असून ती रस्त्यात समाविष्ट करण्यात आली होती. न्यायालयाच्या आदेशानुसार नगरपालिकेने तात्काळ मावेजा देणे अपेक्षित ▶▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### राऊळगाव स्फोटातील मृतांच्या वारसांना पाच लाखांची मदत

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून दुर्घटनेवर शोक प्रकट**

**मुंबई । प्रतिनिधी**

नागपूर जिल्ह्यातील राऊळगाव येथे स्फोटकांच्या एका फॅक्टरीत झालेल्या स्फोटाची घटना अतिशय दुर्दैवी आणि दुःखद असल्याचे नमूद करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुर्घटनेत मृत्यू झालेल्यांच्या वारसांना पाच लाख रुपये आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले आहे. याशिवाय संबंधित कंपनी देखील मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणार आहे. या घटनेची सखोल चौकशी करण्याचे आदेश मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, मी स्थानिक प्रशासनाशी सातत्याने संपर्कात आहे. जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक हे तातडीने घटनास्थळी पोहोचले आहेत. एनडीआरएफ, एसडीआरएफचे पथक सुद्धा घटनास्थळी आहे. 'पेसो' आणि 'डिश' यांची पथके पोहोचली आहेत. मदतकार्याला वेग देण्यात आला असून आतापर्यंत १७ जणांचा मृत्यू झाला आहे, तर १८ जण जखमी झाले आहेत. जखमींना तातडीने नागपूरला हलवण्यात आले आहे. मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. तसेच जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी, अशी प्रार्थना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे.


# 'सक्षम कौशल्य सर्वेक्षण' विकसित भारत आणि विकसित महाराष्ट्र संकल्पनेतील महत्वपूर्ण पाऊल –सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार

**देशातील पहिल्या सर्वेक्षण योजनेतून १५ हजार युवकांना प्रशिक्षण आणि पाच हजार रोजगारनिर्मितीचा संकल्प**

**मुंबई । प्रतिनिधी**

युवकांचा देश असलेल्या भारतातील तरुण पिढीमध्ये जागतिक पातळीवर नेतृत्व करण्याची क्षमता आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे 'विकसित भारत २०४७' हे स्वप्न आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडलेला 'विकसित महाराष्ट्र'चा रोडमॅप साकार करण्यासाठी कौशल्य विकास हा पायाभूत टप्पा आहे. शासनाच्या या संकल्पनेमध्ये युवकांच्या क्षमतेचा कल जाणून घेणारी 'सक्षम कौशल्य ▶▶ उर्वरित पान २ वर






# VSR चे मालक रोहित सिंह मुख्य पायलटच्या सीटवर उड्डाण दरम्यान झोपले; जय पवारांनी शेअर केला धक्कादायक Video

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे दिवंगत उमुख्यमंत्री अजित पवारांच्या विमानाला २८ जानेवारीला अपघात झाला. या घटनेच्या १ महिन्यानंतर विमान अपघाताचा प्राथमिक अहवाल समोर आला. विमान अपघात चौकशी प्राधिकरणाकडून २२ पानांचा प्राथमिक अहवाल सादर करण्यात आला. या अहवालात सुरुवातीला हे विमान झाडावर आदळलं. त्यानंतर जमिनीवर कोसळलं. ही घटना घडली तेव्हा बारामती विमानतळावर ३ हजार मीटर दृश्यमानता होती,असं अहवालात नमूद करण्यात आलं. तर, उड्डाणापूर्वी पायलटनं मद्यपान केलं नव्हतं, असंही अहवालात म्हटलंय. दरम्यान, अजित पवार यांचे पुत्र जय पवार यांनी एक धक्कादायक व्हिडीओ सोशल मीडियावर शेअर केला आहे. यामध्ये तडठ चे मालक रोहित सिंह मुख्य पायलटच्या सीटवर उड्डाणादरम्यान झोपलेले असल्याचा दावा जय पवार यांनी केला आहे.

माझ्या वडिलांना आपण गमावले. ही वेदना आयुष्यभर साथ देणार आहे. या व्हिडीओमध्ये तडठ चे मालक रोहित सिंह मुख्य पायलटच्या सीटवर उड्डाणादरम्यान झोपलेले दिसत आहेत. आकाशात असताना असा निष्काळजीपणा असू ▶▶ उर्वरित पान २ वर



दैनिक मराठवाडा पत्र



◆ संपादकीय...

# दोषांची होळी करूया !

प्रत्येक माणसांत जसे काहीनाकाही गुण असतात, तसे असंख्य दोषही असतात. या दोषांमुळे जीवनात अनेकदा अपयश पदरी पडते, अपमान सहन करावा लागतो, नात्यांमध्ये वितुष्ट निर्माण होते, अनेकदा आर्थिक हानीही सहन करावी लागते. हे दोष माणसाचे कट्टर वैरी असतात त्यामुळे फाल्गुन महिन्याच्या पौर्णिमेला म्हणजेच हुताशनी पौर्णिमेच्या दिवशी आपल्यातील दोष, अनिष्ट विचार होळीत टाकून ते नष्ट करावेत असे हिंदु धर्मशास्त्र सांगते. पुढे १५ दिवसांनी हिंदू नववर्षारंभ म्हणजेच गुढीपाडवा येतो. या दिवशी नवा संकल्प केला जातो. मात्र खरोखर अशाप्रकारे दोषांची होळी करता येते का ? आपल्यातील दोष होळीत जाळून एका दिवसांत नष्ट करता येतात का ? आपल्या प्रत्येकावर जन्मोजन्मीचे संस्कार असतात, या संस्कारांतूनच आपल्यांत गुणांची आणि दोषांची निर्मिती झालेली असते. आपल्यामध्ये कोणकोणते दोष आहेत हे प्रत्येकाला चांगलेच ठाऊक असते. होळीमध्ये जाळून असे सर्व दोष नष्ट जरी करता नाही आले, तरी या दिवशी आपल्यातील २ प्रबळ दोष नष्ट करण्याचा निश्चय तर आपण नक्कीच करू शकतो. हा निश्चय एकदा झाला कि पुढचे १५ दिवस आपल्या हातात असतात या १५ दिवसांत सर्व प्रयत्नांची शिकस्त करून ते नष्ट करण्याचा प्रयत्न करावा जेणेकरून पुढे येणाऱ्या नवीन वर्षात या दोषांमुळे आपली होणारी हानी टळेल. २ प्रबळ दोषांवर आपल्याला मात करता आल्याने मिळणारा नवीन वर्षाचा आनंद काही वेगळाच असेल, चला तर यंदा होळीला आपल्यातील किमान २ दोषांची होळी करण्याचा संकल्प करूया !

# फटक्यांसह दगडांचाही मारा, भारतातील 'या' अजब ठिकाणी साजरा करतात अतरंगी होळी





सामान्यपणे होळी हा सण रंगाची उधळण करून साजरा केला जातो. मात्र, भारतातील काही ठिकाणी होळीच्या विविध परंपरा असून तेथे रंगांऐवजी परंपरेनुसार होळीचा सण साजरा केला जातो.

पंजाबमध्ये कोडा मार होळी (फटक्यांची होळी) ही परंपरा असून यावेळी देवर-भाभी (दीर-भावजय) एकमेकांना रंग लावून हुडदंग करतात तर भाभी त्यांना प्रेमाने फटके मारुन उत्तर देतात.

राजस्थानमधील भिलवाडा या ठिकाणी होळीच्या दिवशी जिवंत व्यक्तीची मृत यात्रा काढली जाते. वाजत-गाजत रंग आणि गुलालाची उधळण करत ही मजेशीर मृत यात्रा काढण्याची येथील परंपरा आहे.

तर मध्य प्रदेशातील झाबुआमध्ये होलिका दहन झाल्यानंतर होळीच्या आगीवर चालण्याची परंपरा पार पाडली जाते. मान्यतेनुसार या परंपरेमुळे आपल्यावर कोणतंही संकट येत नाही.

आंध्रप्रदेशच्या कुरनूल जिल्ह्यातील संथेकुडलूर गावात होळीला पुरुष वर्ग साडी नेसून महिलांसारखा साज-श्रृगांर करून सण साजरा करतात. ही परंपरा तेथील ग्रामदेवतांना प्रसन्न करण्यासाठी पार पाडली जाते.

तसेच, राजस्थानच्या बांसवाडा आणि डूंगरपुरमधील आदिवासी बांधव एकमेकांवर दगडांचा मारा करून होळीचा सण साजरा करतात.

हिमाचल प्रदेशातील मंडी येथे होळीच्या दिवशी मुलींना आणि बहिणींना आपल्या शेतातील धान्य पाठवण्याची परंपरा आहे. या परंपरेमागे घरात सुख-समृद्धी टिकून राहते अशी मान्यता आहे.

तर प्रयागराजमध्ये होलिका दहनाच्या एक दिवसआधी चक्क हातोड्याची वरात काढण्याची आगळीवेगळी परंपरा आहे.





◆ पान ४ वरून पुढे...

## कार्यकर्त्यांनी सामाजिक...

बाजूला ठेवून राजकीय जोडे बाजूला ठेवून शाळेच्या विकासासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे ग्रामीण भागामध्ये सोयीप्रमाणे वस्त्यांमध्ये राहण्याचे प्रमाण वाढल्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेत येणे जाण्यासाठी सायकलींची अत्यंत आवश्यकता आहे हे लक्षात घेऊन हा अत्यंत स्तुत्य उपक्रम गंगाधर पडोळे यांनी राबवला आहे. जिल्हा परिषद शाळा टिकल्या पाहिजेत, यासाठी समाजाने पुढाकार घेतला पाहिजे. आष्टी तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांनी गुणवत्ता टिकवून ठेवली असून त्यामुळे पटसंख्याही समाधानकारक आहे. हीच गुणवत्ता पुढेही कायम ठेवण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत.सध्याच्या डिजिटल युगाचा उल्लेख करत त्यांनी सांगितले की, एआयच्या स्पर्धेच्या काळात विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान मिळणे अत्यावश्यक आहे. मात्र पालकांनी मोबाईलचा वापर योग्य कारणांसाठीच मुलांच्या हातात द्यावा. मोबाईलचे फायदे असले तरी त्याचे दुरुपयोगही मोठ्या प्रमाणात होत असल्याने सजग राहणे गरजेचे आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संयोजक माजी सरपंच गंगाधर पडोळे म्हणाले, मी दरवर्षी आमदार धस यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांद्वारे साजरा करतो यावर्षी सामाजिक उपक्रम राबवायचा निर्णय घेऊन गरीब विद्यार्थिनी विद्यार्थी यांना सायकलींचे वाटप करता आले, याचे समाधान वाटते. पुढेही शैक्षणिक क्षेत्रात असेच उपक्रम राबविण्याचा मानस आहे. यावेळी संदीप खकाळ म्हणाले, आ.धस यांनी विधानभवनात केलेल्या भाषणात सांगितल्याप्रमाणे शेतकऱ्यांनी -ख शेतीकडे वळावे,माजी सरपंच गंगा पडोळे यांनी शालेय विध्यार्थ्यांना सायकल वाटप करून स्तुत्य उपक्रम राबिविला आहे. यावेळी प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांचे समायोजित भाषणे झाली- या कार्यक्रमास भाजपा तालुकाध्यक्ष रमेश गावडे, जेष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे, संदीप खकाळ, अजित घुले, राम धुमाळ, बिभीषण पडोळे, ॲड. बाळासाहेब मोरे, दीपक सोनवणे, गौतम आजबे,चेअरमन विठ्ठल शेबडे,माजी सरपंच महादेव पडोळे, माजी सरपंच राम धुमाळ,पोपट नरवडे,अरुण पडोळे,गोरख सोनवणे,नवनाथ वाघुले,अंगद पडोळे,रामेश्वर पडोळे,बीबीशन पडोळे,बाळासाहेब पडोळे,बाबासाहेब पडोळे,अप्पासाहेब पडोळे,बाबासाहेब पडोळे,महादेव पडोळे, एकनाथ पडोळे,शिवदास पडोळे,सचिन पडोळे, पत्रकार प्रविण पोकळे, पत्रकार गणेश दळवी,पत्रकार सचिन रानडे,पत्रकार अविशांत कुमकर,शरद गर्जे आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच शाळेचे मुख्याध्यापक जगन्नाथ भगत, श्रीमती अशा ठाकर, जया चौधरी, सुनिता वाळके, सुप्रिया हिंगे, शहाजी तोतरे, संदीप जगताप यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब तळेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक जे. एस. भगत यांनी मानले. केळसांगवी येथे पार पडलेल्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामस्थांकडून या सामाजिक उपक्रमाचे कौतुक करण्यात येत आहे.

## मातोश्री कॅम्पसमध्ये...

सदस्यांच्या उपस्थितीत हा उत्सव मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. होळीच्या मंगल पर्वावर मातोश्री कॅम्पसमध्ये पारंपरिक पद्धतीने विधिवत पूजाअर्चा करून होळी प्रज्वलित करण्यात आली. यावेळी पर्यावरणाचे भान राखून नैसर्गिक साहित्यांचा वापर करत पर्यावरणपूरक होळी साजरी करण्यावर आणि वृक्षतोड थांबवण्यावर संस्थेच्या वतीने विशेष भर देण्यात आला.या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष विशाल डोळस,तेजस पवार,रोहन डोळस,सदस्य, स्थानिंक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आदित्य एज्युकेशन...

कबड्डी, खो-खो, क्रिकेट, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, रस्सीखेच आदी खेळांचा समावेश असून विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वृत्ती, शिस्त, सांघिक खेळाचे महत्त्व अधोरेखित केले जाणार आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल- नृत्य, गायन, एकांकिका, समूहगीत, वाद्यवृंद, फॅशन शो, पारंपरिक लोककला, विविध वेशभूषा, आधुनिक कला प्रकारांचे सादरीकरण होणार आहे. विविध महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या सादरीकरणामुळे संपूर्ण परिसरात उत्सवाचे वातावरण निर्माण होणार आहे.

## नांदूर घाट मध्ये...

यांनी सांगितले की, आम्ही स्थानिक लाभार्थ्यांच्या बँक खात्यांसह रीतसर प्रस्ताव पंचायत समितीकडे पाठवले होते. मात्र, तरीही ९ जणांचे हप्ते परराज्यातील लोकांच्या खात्यात जमा झाल्याचे स्पष्ट झाले आहे. ही चूक नेमकी कुठे झाली आणि किती रक्कम वर्ग झाली, याची यादी आम्ही पंचायत समितीकडे मागितली आहे. गटविकास अधिकारी विठ्ठल नागरगोजे यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली आहे. रीतसर तक्रार प्राप्त झाल्यानंतर बीड येथील तांत्रिक विभागाच्या 'टेक्निकल एक्सपर्ट' मार्फत या प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल आणि दोषींवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितलं.

◆ पान ९ वरून पुढे...

## आणखी एक न्यायालयीन....

यांच्यासह विविध जनहित याचिका यांच्यावरती एकत्रित निकाल देताना हे आरोप केवळ व्यावसायिक दृष्टिकोनातून व खोट्या पुराव्यांच्या आधारे केलेले असून राज्य शासनाने घेतलेल्या धोरणात्मक निर्णयावर व्यवसायिक दृष्टीने खोटी माहिती समोर आणून शंका उपस्थित करणे हे कायद्याला धरून नसल्याचे स्पष्ट करत, सर्व याचिका फेटाळून लावल्या होत्या. तसेच याचिकाकर्त्यांना एक लाख रुपयांचा दंड ठोठावला होता. त्यानंतर संबंधित याचिकाकर्त्यांना जर निकाल मान्य नसता तर त्यांनी सर्वोच्च न्यायालयात या विरोधात अपील करायला हवे होते मात्र त्यांनी अद्याप अपील न करता दंड भरला; याचाच अर्थ याचिका करते यांना सुद्धा उच्च न्यायालयाने दिलेला निकाल मान्य होता.

उच्च न्यायालयाने या निकालामध्ये नोंदविलेली निरीक्षणे ही स्वयंस्पष्ट, निर्णायक व शासनाच्या धोरणाला अनुसरून असल्याने तसेच याचिकाकर्त्या अंजली दमानिया यांच्याकडे संबंधित याचिकेमध्ये जोडलेल्या बाबींव्यतिरिक्त, बनावट पुरावे असून कुठलाही ठोस पुरावा किंवा दखल घेण्यायोग्य काहीही नसल्याने यामध्ये आणखी वेगळी सुनावणी घेण्याचा कोणताही मुद्दा शिल्लक राहत नाही, असेही लोकायुक्तांनी आपल्या निकालात स्पष्ट केले आहे. कृषी साहित्य खरेदी सोबतच अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात ऑफिस प्रॉफिट सह विविध आरोप केले होते. यासंदर्भात धनंजय मुंडे यांचे वकील श्री शार्दुल सिंह यांनी धनंजय मुंडे यांची बाजू मांडताना खासदार जया बच्चन यांच्या संबंधातील सर्वोच्च न्यायालयाच्या एका खटल्याचा संदर्भ देत ऑफिसर प्रॉफिट बाबत लोकायुक्तांकडे देण्यात आलेली माहिती ही चुकीची व अर्धवट असल्याचे नमूद केले. या प्रकरणात देखील संविधानातील ठराविक काही कलमे, लोकप्रतिनिधीत्व कायदा, लोकप्रतिनिधींच्या हक्कांचे संरक्षण यांसह सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक सूचनांचा अभ्यास केला असून, लोक आयुक्तांच्या अखत्यारीतील कोणताही ऑफिस ऑफ प्रॉफिटचा मुद्दा किंवा त्या अनुषंगाने कुठलाही आरोप सिद्ध होत नाही; तसेच याचिकाकर्ते अंजली दमानिया यांनी याबाबत देखील कुठलाही महत्त्वाचा नवीन पुरावा त्यांच्या पुरवणी जबाबात देखील सादर केलेला नाही. त्यामुळे ऑफिस ऑफ प्रॉफिट चा मुद्दा हा देखील निकाली काढला असून, त्यातही धनंजय मुंडे यांना क्लीन चीट देण्यात आली आहे. दरम्यान मागील एका वर्षापासून अंजली दमानिया यांनी धनंजय मुंडे यांच्या विरोधात जे काही आरोप केले ते उच्च न्यायालयाने फेटाळून लावल्यानंतर आता लोकायुक्तांनी देखील सदर आरोप फेटाळून लावले असल्याने, अंजली दमानिया यांच्या केवळ तोंडाच्या वाफा व धनंजय मुंडे यांच्या बदनामीचा असफल प्रयत्न होता, हे सिद्ध झाले आहे, अंजली दमानिया यांना या निकालाने एकप्रकारे न्यायव्यवस्थेने एक प्रकारची चपराक लावली आहे, असे म्हणावे लागेल. दरम्यान धनंजय मुंडे यांच्या वरती मागील काही महिन्यात वेगवेगळ्या प्रकारचे अनेक आरोप करण्यात आले, त्यावरून त्यांची बदनामी करण्याची एकही संधी विरोधकांनी सोडली नाही, मात्र मुंडे यांच्या विरोधातील एक एक आरोप खोटा सिद्ध होण्याची मालिका देखील सुरू असून आज त्यात या निकालाने महत्वाची भर पडली आहे.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्येस...

तंबाखु लागवडीसाठी रीतसर परवानगी देण्यात यावी या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आज दि.०२ होळी दिवशी सोमवार रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शेतकरी विरोधी कायद्यांची होळी करत सरकार विरोधी धोरणांच्या निषेधार्थ बोंबा ठोकत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. निवेदन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते राष्ट्रपती, पंतप्रधान, केंद्रीय कृषिमंत्री, राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना देण्यात आले.यावेळी आंदोलनात रामनाथ खोड,शेख युनुस,सुदाम तांदळे,शेख मुबीन, बाळासाहेब मोरे पाटील (प्रांताध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच) माजी सैनिक अशोक येडे ( बीड जिल्हाध्यक्ष आम आदमी पार्टी) ,रामधन जमाले ( बीड जिल्हाध्यक्ष इंटक), कुलदीप करपे(बीड जिल्हाध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना), सुहास जायभाये ( बीड जिल्हा कोषाध्यक्ष डीवायएफआय), डॉ.संजय तांदळे ( अध्यक्ष सामाजिक कार्यकर्ता संघटना बीड), प्राचार्य डी .जी.तांदळे(बीड अध्यक्ष किसान सभा महाराष्ट्र राज्य),प्रा.कॉ. विठ्ठलराव सवासे (किसान सभा म.रा.बीड ), प्रभाकर धुमाळ, राजेंद्र धुमाळ,माऊली शिंदे जिल्हा सदस्य आम आदमी पार्टी बीड आदी सहभागी होते. एनसीबीआरच्या अहवालानुसार सन २०२३ मध्ये भारतात १०,७०० शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन महाराष्ट्र सर्वप्रथम क्रमांकावर असुन ३८.५ टक्के प्रमाण आहे. महाराष्ट्रात मराठवाड्यात बीड जिल्ह्यात गेल्या वर्षी २५६ शेतकरी आत्महत्यांची नोंद असुन नविन वर्षाच्या सुरुवातीला दिड महिन्यात ३९ शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले आहे. निसर्गाची अवकृपा,,वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला योग्य भाव नसणे, शेतीमालाला निर्यातबंदी आणि कर्जबाजारीपणा या शेतकरी विरोधी धोरणा बरोबरच कमाल शेतजमीन धारणा कायदा, आवश्यक वस्तु कायदा, जमिन अधिग्रहण कायदा हे नरभक्षी कायदे रद्द करण्यात यावेत.शेतीमालाला निर्यातबंदी कायमची रद्द करावी. तसेच शेतीमालाला भाव मिळत नसल्याने एनडीपीएस कायद्यांतर्गत बदल करून शेतकऱ्यांना सशर्त गांजा,अफु, तंबाखू लागवडीस परवानगी देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली.

## सोळा गुंठे जमीन...

असताना अद्यापही रक्कम अदा करण्यात आलेली नाही. त्यामुळे न्यायालयाच्या आदेशाचे पालन न झाल्याने नवनाथ शिराळे व गोरख शिराळे यांनी माननीय उच्च न्यायालय, संभाजीनगर खंडपीठात अवमान याचिका दाखल केली आहे. दरम्यान, संबंधित प्रकरणात रस्ता अडविण्यात आला आहे अशी चर्चा काही ठिकाणी होत असली तरी शिराळे बंधूंनी कोणताही रस्ता अडविलेला नसल्याचा स्पष्ट खुलासा करण्यात आला आहे. उलट नगरपालिकेच्या गुत्तेदाराने रस्त्याचे काम अपूर्ण ठेवले असल्याचे सांगण्यात आले. नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांनी मावेजा देण्यास उदासीनता दाखविल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. न्यायालयाच्या आदेशाचे तातडीने पालन करून मावेजा अदा करावा आणि रखडलेले रस्त्याचे काम पूर्ण करावे, अशी मागणी संबंधितांकडून करण्यात येत आहे. या संदर्भात काल झालेल्या विशेष अर्थसंकल्पीय सभेमध्ये नगराध्यक्ष, मुख्याधिकारी तसेच बीड शहरातील सर्व सन्माननीय नगरसेवकांसमोर विषय मांडण्यात आला. न्यायालयीन आदेशाचा सन्मान राखत नागरिकांना न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. न्यायालयाने आमच्या बाजूने स्पष्ट आदेश दिला आहे. आम्ही रस्ता अडविलेला नाही. फक्त योग्य तो मावेजा मिळावा हीच आमची मागणी आहे, असे संबंधितांनी सांगितले. नागरिकांमध्ये या प्रकरणाची चर्चा सुरू असून, आता नगरपालिकेकडून काय भूमिका घेतली जाते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## 'सक्षम कौशल्य सर्वेक्षण...

सर्वेक्षण' योजना देशातील अशी पहिलीच सर्वेक्षण योजना असून रोजगार निर्मितीसाठी मुंबई उपनगर जिल्ह्याने महत्वाचे उचललेले पाऊल राज्यासाठी दिशादर्शक ठरेल, असा विश्वास सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी व्यक्त केला. मुंबईतील वांद्रे, खार, सांताक्रुझ पश्चिम भागातील (एच पश्चिम वॉर्ड) सुमारे ५५ हजार घरांतील युवकांचा कौशल्य क्षमता कल जाणून घेण्यासाठी सुरू होत असलेल्या 'सक्षम कौशल्य सर्वेक्षण' योजनेचे उद्घाटन पालकमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते झाले. त्यांच्याच संकल्पनेतून सुरू करण्यात आलेले हे सर्वेक्षण मुंबई उपनगर जिल्हाधिकारी कार्यालय आणि कौशल्य विकास विभागामार्फत राबविण्यात येणार आहे. वांद्रे पश्चिम येथील नॅशनल कॉलेजच्या सभागृहात झालेल्या या योजनेच्या उद्घाटन समारंभास स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासह कौशल्य विकास उपायुक्त आनंद माळी, राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्थेचे विभागीय संचालक सी.एस. मूर्ती, कौशल्य विकास विभाग मुंबईचे उपायुक्त सचिन जाधव, सहायक आयुक्त शैलेश भगत, नॅशनल कॉलेजच्या प्राचार्य नेहा जगतियानी, जिल्हाधिकारी कार्यालय आणि कौशल्य विकास विभागातील अधिकारी, उद्योजक, विविध महाविद्यालयांचे प्राचार्य आणि विद्यार्थी उपस्थित होते. पालकमंत्री ॲड.आशिष शेलार म्हणाले, भारताकडे लोकसंख्येचे सामर्थ्य आहे. युवकांना योग्य दिशा, कौशल्यविकास आणि रोजगारनिर्मितीची संधी मिळत असल्याने भारत जागतिक नेतृत्वाकडे वाटचाल करू शकतो. 'सक्षम कौशल्य सर्वेक्षण' हा युवकांच्या क्षमता आणि कौशल्य कल जाणून घेण्यासाठीचा देशातील पहिला उपक्रम आहे. एआय-आधारित आणि पारदर्शक पद्धतीने १८ ते ४० वयोगटातील युवकांचा सर्वेक्षणाद्वारे डेटा संकलित करुन त्याआधारे युवकांची कौशल्ये ओळखून त्यांना प्रशिक्षण संस्थांशी जोडले जाईल. या सर्वेक्षणानंतर २०२७ पर्यंत सुमारे १५ हजार युवकांना प्रशिक्षण देण्याचा आणि त्यापैकी पाच हजार युवकांना रोजगार किंवा उद्योजकतेच्या माध्यमातून स्वावलंबी करण्याचा संकल्प आहे. यासाठी उद्योग, विविध कंपन्या आणि कॉर्पोरेट क्षेत्राशी समन्वय साधून रोजगार किंवा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी साखळी व्यवस्था उभी केली जाईल. यासाठी शासनाबरोबरच महाविद्यालयांनी आणि युवकांनी पुढाकार घेण्याचे आवाहन पालकमंत्री ॲड शेलार यांनी केले.

## VSR चे मालक...

शकत नाही. हे अत्यंत गंभीर आणि धक्कादायक आहे, असं जय पवार म्हणाले. मी DGCA ला ठामपणे मागणी करतो की, या प्रकरणात तात्काळ कठोर कारवाई व्हावी. संपूर्ण चौकशी होईपर्यंत VSR ची सर्व विमाने तात्काळ ग्राउंड करण्यात यावीत आणि रोहित सिंह यांना त्वरित अटक करून कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावीही एका मुलाची आर्तहाक आहे. माझ्या वडिलांसाठी आणि प्रत्येक प्रवाशाच्या सुरक्षिततेसाठी... असं जय पवार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सांगितले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

दैनिक मराठवाडा पत्र



# ज्ञान, संस्कार आणि सांस्कृतिक वैभवाचा दिमाखदार संगम




## मानुरकर महाराज इंग्लिश स्कूलचे भव्य वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

श्री नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ संचलित मानुरकर महाराज इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शनिवारी सायंकाळी ६ वाजता अत्यंत दिमाखदार आणि उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिस्त, गुणवत्ता आणि संस्कार यांचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री ष. ब्र. १०८ गुरुवीरूपाक्ष शिवाचार्य मानुरकर महाराज (मठाधिपती, श्री क्षेत्र नागनाथ देवस्थान जहागिरदार मठ संस्थान, मानूर तथा अध्यक्ष, श्री नागनाथ शिक्षण प्रसारक मंडळ) विराजमान होते. उद्घाटक म्हणून ह.भ.प. तळेकर महाराज, ह.भ.प. विवेक महाराज शास्त्री व गोरक्ष भिलारे महाराज यांची मंगल उपस्थिती लाभली. प्रमुख अतिथी म्हणून सुरेश घोळवे तहसीलदार, देविदास खांडखुळे पोलीस उपनिरीक्षक, लक्ष्मण तांदळे, प्रकाश सवासे सरपंच अक्षय जाधव , बबन पाटील मोरे अजिनाथ कदम विजयकुमार गाडेकर, रामराजा गुरसुळकर, भारतकुमार पानसंबळ, नवनाथ येवले, बालकृष्ण मंगरूळकर, शाहेबाज पठाण आदी मान्यवर उपस्थित होते. तालुक्यातील पालक व रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक दीपप्रज्वलनाने झाली. मुख्याध्यापक प्रशांत घुले यांनी प्रास्ताविकातून शाळेची शैक्षणिक प्रगती, विविध उपक्रम व भावी वाटचालीचा सविस्तर आढावा मांडला. सूत्रसंचालन जयश्री घुले, संगीता भारती व नाशिकेत काळे यांनी ओजस्वी व नेटक्या शैलीत केले. अध्यक्षीय भाषणात गुरुवीरूपाक्ष शिवाचार्य मानुरकर महाराज यांनी विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच नैतिक मूल्ये, शिस्त आणि चारित्र्य जोपासावे, असे मार्गदर्शन केले. तहसीलदार सुरेश घोळवे यांनी स्पर्धात्मक युगात आत्मविश्वास, परिश्रम आणि सकारात्मक दृष्टिकोनाचे महत्त्व अधोरेखित केले. ह.भ.प. तळेकर महाराज व ह.भ.प. विवेक महाराज शास्त्री यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रनिर्मितीत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे प्रेरणादायी आवाहन केले.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. 'ऑपरेशन सिंदूर', 'छावा' सामाजिक नाट्यप्रयोग, 'मंगलमूर्ती मोरया', शेतकरी विषयावरील नाटिका, गोंधळ, 'रक्तचरित' कोळीगीत, लावणी, आदिवासी नृत्य तसेच साऊथ डान्स आदी सादरीकरणांनी सांस्कृतिक वैविध्याचे दर्शन घडवले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनामागे शिक्षकवृंद कृष्णा सुरवसे, वीरभद्र गुरसुळकर, रेवण बोरगे, अर्जुन मंडलिक, प्रवीण ढगे, रेखा तांबे, संध्या बांदल, मोहिनी जायभाये, शीतल गायकवाड, जागृती सवासे, स्वप्नाली परकड, प्रियंका बडे, रेखा घोडके, पायल परदेशी तसेच शिक्षकेत्तर कर्मचारी रामनाथ शिंदे, सुषमा पावसे व मुक्तार शेख यांचे मोलाचे योगदान लाभले. समारोप प्रसंगी सुवर्णा परदेशी यांनी आभार प्रदर्शन केले. हा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा केवळ सांस्कृतिक कार्यक्रम न ठरता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचा आणि शाळेच्या गुणवत्तापूर्ण शैक्षणिक वाटचालीचा प्रभावी आविष्कार ठरला.

## सौ. के.एस. के. महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकाचा प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास शिबीरात सहभाग

**बीड । प्रतिनिधी**

येथील सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर ऊर्फ काकू, कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकाचा प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुणविकास शिबिरास उत्स्फुर्त सहभाग. राष्ट्रीय सेवा योजना आणि साावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व



गुणविकास शिबीरामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या संघामध्ये बीड येथील सौ. केएसके महाविद्यालयाचा विद्यार्थी चि. सिध्दार्थ वाघमारे यांनी विद्यापीठ संघाचे नेतृत्व केले. त्याबद्दल त्याचे महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद क्षीरसागर, उपप्राचार्य डॉ. अनिता शिंदे, पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ. खान ए.एस., कमवि उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, कार्यक्रमाधिकारी डॉ. यादव घोडके, डॉ. पल्लवी इरलापल्ले, डॉ. सय्यद इमाद, डॉ. बिसेन ए. आर., डॉ. प्रकाश गायकवाड आदी उपस्थित होते.

## रयत सामाजिक प्रतिष्ठानचा 16वा पुरस्कार वितरण सोहळा 2026 दिमाखात संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक, सांस्कृतिक व कला क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रोत्साहन देऊन त्यांचा उत्साह वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने रयत सामाजिक प्रतिष्ठानचा १६वा पुरस्कार वितरण सोहळा २०२६ बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात अत्यंत भव्य आणि दिमाखदार वातावरणात उत्साहात पार पडला. यशवंतराव



चव्हाण नाट्यगृहत उपस्थित मान्यवर, कलाकार आणि नागरिकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात सन्मानितांचा गौरव करण्यात आला. हा सोहळा प्रतिष्ठानच्या रोहिणीताई गणेश माने यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन व आयोजन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सुलोचना माने व शुभांगी माने यांनी केले होते. त्यांच्या नियोजनबद्ध कामामुळे संपूर्ण कार्यक्रमात शिस्त, उत्साह आणि प्रेरणादायी वातावरण अनुभवायला मिळाले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण ठरले ते प्रमुख उपस्थिती राजेश दादा खर्डे (वेसावकर) यांची पारंपरिक कोळी वेशातील दमदार एन्ट्री. त्यांच्या आगमनाने सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

## जि.प.प्रा.शा.तांदळवाडी घाट येथे विविध प्रयोगांद्वारे राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा



**बीड । प्रतिनिधी**

तांदळवाडी घाट येथील जि. प. प्राथमिक शाळेत 'राष्ट्रीय विज्ञान दिन' उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात भारताचे महान शास्त्रज्ञ डॉ.सी.व्ही.रमण यांच्या प्रतिमेला अभिवादन करून करण्यात आली. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थितीतील तांदळेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. श्यामजी डाके सर यांनी विद्यार्थ्यांचे प्रयोग पाहून कौतुक केले व प्रयोगातून शिकलेले विज्ञान आयुष्यभर लक्षात राहते असे मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी रासायनिक अभिक्रिया, हवेचा दाब, घर्षण बल, स्थिर विद्युत, घनता, साधा विद्युत परिपथ, पृष्ठतनाव, पाणी शुद्धीकरण, सौर ऊर्जा तसेच हायड्रॉलिक गउइ मॉडेल यांसारखे विविध प्रयोग सादर केले. इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांनी पदार्थांची चव ओळखण्याचा उपक्रम सादर करून उपस्थितांचे लक्ष वेधले. विद्यार्थ्यांनी प्रयोगांमधून विज्ञानातील संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून स्पष्ट केल्या. या प्रयोगांसाठी विद्यार्थ्यांना श्री. भगवान वाघमारे सर,श्री.महेश फसले सर,श्रीमती सुनीता शिंदे मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन व जिज्ञासा विकसित होत असून प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण या पद्धतीतून विज्ञान अधिक रंजक बनत असल्याचे यावेळी अधोरेखित झाले.

## राजमाता मार्गदर्शन केंद्राची केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेशपूर्व परिक्षेत उत्तुंग भरारी ; पाचपेक्षा जास्त विद्यार्थी दोनशेहून अधिक गुणांनी उत्तीर्ण

**वडवणी । प्रतिनिधी**



वडवणी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तेचे प्रवेशव्दार असणाऱ्या येथील राजमाता मार्गदर्शन केंद्राच्या विद्यार्थ्यांनी केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेश पूर्व परिक्षेत नेत्रदिपक असे सुवर्ण यश मिळवले असून गुणवत्तेत उत्तुंग भरारी घेत वडवणी सारख्या ग्रामीण भागातून देखील पाच पेक्षा जास्त विद्यार्थी दोनशेहून अधिक पुन्हा गुणांनी या परिक्षेत उत्तीर्ण झालेले आहेत. या विद्यार्थ्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणारे त्यांचे मार्गदर्शक अंगद मद्देवाड सर व पवन आरसेवाड सर यांचे व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन व कौतुक होत आहे. मागील अनेक वर्षांपासून वडवणी शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी स्पर्धात्मक मार्गदर्शनासाठी नेहमी एक आशेचा किरण व गुणवत्तेचे प्रवेशव्दार असलेल्या येथील राजमाता मार्गदर्शन केंद्राच्या शिरपेच्यात पुन्हा एकदा मानाचा तुरा रोवला गेला आहे. इयत्ता पाचवीतील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती, नवोदय, त्याचप्रमाणे केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेशपूर्व परिक्षेची तयारी या मार्गदर्शन केंद्राच्या माध्यमातून व अंगद मद्देवाड सर व पवन आरसेवाड सर सर या दोन्ही मार्गदर्शकांच्या अथक परिश्रमातून करण्यात आली होती. विद्यार्थ्यांनीही त्यांच्या स्वप्नांना व अपेक्षांना उत्तम अशा निकालातून वेळोवेळी एक प्रकारे बळ देण्याचे काम केलेले आहे, व ते करतही आहेत. नुकत्याच जानेवारी महिन्यात संपन्न झालेल्या केंद्रिय सैनिक विद्यालय प्रवेशपूर्व परिक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला असून या निकालात राजमाता मार्गदर्शन केंद्राचे चि.अथर्व बंडू नागरगोजे याने ३०० गुणांपैकी तब्बल २८४ गुण, चि.राजवीर बाळासाहेब घुगे याने २६८ गुण, कु.तनिष्का उध्दव बडे हिने २५९ गुण, कु.स्वानंदी बाबु गवळी हिने २१६ गुण, कु.मनवा ज्ञानेश्वर वाव्हळ हिने २०६ गुण मिळवून ते तसेच इतरही अनेक विद्यार्थी प्रवेशास पात्र झाले आहेत. विशेष म्हणजे चि.अथर्व बंडू नागरगोजे याने ३०० गुणांपैकी तब्बल २८४ गुण मिळवत संपूर्ण भारत देशातून या परिक्षेत १६८ वा क्रमांक पटकाविण्याचा पराक्रम केला आहे. दरम्यान इयत्ता सहावी प्रवेशासाठी ही परिक्षा आयोजित करण्यात आलेली होती. अतिशय अवघड प्रश्नांचा या परिक्षेत समावेश असतो. संपूर्ण पेपरची काठिन्यपातळी अधिक असते तसेच ग्रुपिंग मध्येही या परिक्षेत किमान गुण घेणारे विद्यार्थीच प्रवेशासाठी पात्र ठरतात. मात्र या मार्गदर्शन केंद्राच्या विद्यार्थ्यांनी एकप्रकारे अतिशय अवघड असलेला हा डोंगर सहजरित्या सर केलेला आहे. परिक्षेतील या यशाबध्दल सर्व विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणारे अंगद मद्देवाड सर व पवन आरसेवाड सर यांचे पालक व शिक्षणप्रेमी नागरिकांतून अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

## विज्ञान प्रदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये चिकित्सक विचारसरणी आणि तर्कशुद्ध वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित होतो: विनोद कळेकर

**नेकनूर । प्रतिनिध**

नेकनूर येथील न्यू व्हिजन इंग्लिश स्कूल मध्ये राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त शाळेत विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते त्याचे उद्घाटन शिक्षणप्रेमी विनोद कळेकर यांच्या हस्ते करण्यात आले .

विज्ञानाविषयी आवड निर्माण करणे आणि भविष्यातील शास्त्रज्ञ घडवण्यासाठी पायाभरणी करणे , नवीन कल्पनाशोध आणि प्रकल्पांना व्यासपीठ देऊन विद्यार्थ्यांना संशोधक बनण्यास प्रोत्साहन देणे, शाळेतील विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला



योग्य व्यासपीठ देऊन त्यांच्यातील सुप्त गुण (ड्ज्ञळश्रश्री) बाहेर आणणे या उद्देशाने शाळेत विज्ञान प्रदर्शन भरविण्यात आले होते यामध्ये जवळ जवळ ४० विद्यार्थिनी सहभाग घेतला होता शिक्षकांनी मार्गदर्शन करून वेगेवगेळे प्रयोग मुलांना सांगितले त्या प्रमाणे मुलांनी खूप छान छान प्रयोग करून दाखविले प्रदर्शन हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना भविष्यातील वैज्ञानिक आव्हानांसाठी तयार करण्यासाठी खूप महत्वाचे आहे असे प्रतिपादन प्रदर्शनाचे उद्घाटक श्री विनोद कळेकर यांनी केले

## रस्ता सुरक्षा अभियान २०२६ : जिल्हा वाहतूक शाखेच्या उत्कृष्ट कार्याचा सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा वाहतूक शाखेने दि. ०१ जानेवारी ते ३१ जानेवारी दरम्यान रस्ता सुरक्षा अभियान २०२६ प्रभावीपणे राबविले.

या अभियानांतर्गत जिल्हा वाहतूक शाखेचे सहायक पोलीस निरीक्षक सुभाष सानप व पोलीस



उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी पुढाकार घेत वाहनधारकांसाठी विशेष वाहतूक नियम प्रबोधन शिबिराचे आयोजन केले. रस्ता सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन व अपघात प्रतिबंध याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले.

हे अभियान उत्कृष्टरीत्या राबविल्याबद्दल अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या हस्ते जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर, पोलीस हवालदार आजिनाथ मुंडे व सखाराम घोलप यांना प्रशस्तीपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी विविध मान्यवर उपस्थित होते. जिल्ह्यात रस्ता सुरक्षेबाबत जनजागृती वाढविण्यासाठी वाहतूक शाखेच्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# विज्ञानामूळे महिलांचे जीवन सुसह्य : प्रो. माधुरी शानभाग



### बलभीम महाविद्यालयात महिला कक्षाच्या वतीने आयोजित विशेष व्याख्यानात प्रतिपादन

**बीड । प्रतिनिधी**

विज्ञानाने विविध शोध लावले असून या शोधांमध्ये जीवन जगत असताना मानवाला आवश्यक असणाऱ्या गरजा पुर्ण करण्यासाठी तसेच शारिरीक श्रम कमी व्हावेत विशेषत: महिलांचे श्रम कमी होण्यासाठी विज्ञानाने पीठाची गिरणी, कुकर, गॅस, वीज अशा अनेक उपकरणांमुळे जीवन सुसह्य झाल्याचे प्रतिपादन बेळगाव येथील सुप्रसिद्ध विज्ञान लेखिका तथा अनुवादक प्रो. माधुरी शानभाग यांनी केले.

येथील बलभीम कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात दि. २८ फेब्रुवारी रोजी प्राचार्य डॉ.संतोष उंदरे यांच्या मार्गदर्शनात महिला कक्षाच्या वतीने 'महिला आणि विज्ञान' या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते याप्रसंगी त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. मंचावर महिला कक्ष समन्वयक प्रो. डॉ. ललिता राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. याप्रसंगी माधुरी शानभाग यांनी महिलांसाठी आयोजित या कार्यक्रमात मार्गदर्शन करतांना सांगितले की, विज्ञानामूळे आज अनेक क्षेत्रात महिला आघाडीवर दिसून येतात. महिलांचे परिश्रम कमी झाल्यामूळे इतर क्षेत्रातही महिला खंबीरपणे आपले कर्तव्य निभावतांना दिसतात. विज्ञानाने महिलांचे अनेक शारिरीक, मानसिक व सामाजिक प्रश्न सोडवण्यास मदत केली असून यामूळे चुल आणि मूल ही पारंपारिक चौकट मोडून महिला आत्मविश्वासाने वावरत आहेत. आज असे कोणतेही क्षेत्र नाही जिथे महिला नाहीत ही जी प्रगती दिसून येते यात विज्ञानाचे महत्वाचे योगदान असल्याचे सांगून त्यांनी अनेक कर्तुत्ववान महिलांची उदाहरणे देऊन महिलांचे देशासाठी असणारे योगदान सविस्तर सांगितले.

प्रारंभीच महिला कक्ष समन्वयक डॉ. ललिता राठोड यांनी प्रास्ताविकातून व्याख्यान आयोजनामागील भूमिका मांडली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. पुनम ओहरी यांनी केले तर आभार प्रा. रोहिणी धारमोडे यांनी मानले. या व्याख्यानास महिला कक्षाच्या डॉ. सुचिता खामकर, डॉ. वृशाली कुटे, प्रा. अश्विनी वावरे, डॉ. वर्षा जयसिंगपूरे, डॉ. सविता सुक्ते, डॉ. सुनिता भोसले, डॉ. किर्ती देसाई यांच्यासह महाविद्यालयातील महिला प्राध्यापिका, महिला कर्मचारी व विद्यार्थिनी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दैनिक मराठवाडा पत्र

महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

• संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे • जिल्हा विशेष • मंगळवार दि. ०३ मार्च २०२६ •

## थोडक्यात...

### श्री क्षेत्र मढी येथे मानाच्या होळीसाठी गोपाळ समाजाला उत्साही आवाहन: रामराजे गव्हाणे



**वडवणी । प्रतिनिधी**

राज्यातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान व भटक्यांची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कानिफनाथ गड येथे दिनांक २ मार्च (सोमवार) रोजी मानाची होळी मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. सुमारे ४५० वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेल्या या यात्रोत्सवात राज्यभरातील नाथभक्त व समस्त गोपाळ समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन युवा नेते रामराजे गव्हाणे यांनी केले आहे. गोपाळ समाजाचे आराध्य दैवत चैतन्य कानिफनाथ महाराज यांच्या जयघोषात गावाची पारंपरिक होळी प्रज्वलित केली जाते. गडाच्या उभारणीत गोपाळ समाजाच्या पूर्वजांनी घेतलेल्या परिश्रमांमुळे पंचकमिटीने हजारो वर्षांपूर्वी गोपाळ समाजाला मानाच्या व शेणाच्या पाच गौऱ्या पेटवण्याचा मान दिला असल्याचे सांगितले जाते. पाथर्डी न्यायालयाच्या आदेशानुसार लोणारे, माळी, कालापाड, नवघरे, हबरे व गिऱ्हे या सहा आडनावांच्या समाज बांधवांना होळीचे मानकरी म्हणून सन्मान दिला जातो. समाजाच्या अस्मितेचे प्रतीक असलेली ही मानाची होळी पेटवताना हजारो भाविक उपस्थित राहतात. दरवर्षीप्रमाणे यंदाही समाजाची एकजूट व परंपरा जपण्यासाठी सर्व गोपाळ समाज बांधवांनी आपला अमूल्य वेळ देऊन मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे कळकळीचे आवाहन करण्यात आले आहे. समाजाची एकजूट आणि परंपरेचा अभिमान जपत आपण सर्वांनी मानाच्या होळीत सहभागी व्हावे, असेही रामराजे गव्हाणे यांनी नमूद केले.

### अरीब आहद ईनामदार याचा जीवनातील पहिला रोजा



**उमापूर । प्रतिनिधी**

सध्या मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजानचा महिना सुरू असून जिकडे-तिकडे आनंदाचे व भक्तीभावाचे वातावरण दिसून येत आहे. या महिन्यात सर्व मुस्लिम बांधवांना रोजे ठेवणे फर्ज (अनिवार्य) आहे. महिनाभर त्यामुळे सर्व मुस्लिम महिला पुरुष व युवक युवती इतकेच नव्हे तर लहान मुले-मुली सुद्धा स्वेच्छेने रोजे ठेवून, नमाज व कुरआन पठण करून अल्लाहची (ईश्वराची) इबादत (उपासना) करतात. यामध्ये चिमुकले सुध्दा मागे नसतात. त्यांच्यातही रोजे ठेवण्याची व अल्लाहची इबादत करण्याची चढाओढ असते. या पवित्र महिन्यात लहान मुले-मुलीही रोजा ठेवून अल्लाहकडे दुआ (प्रार्थना) करतात. रविवार दिनांक १ मार्च २०२५ रोजी उमापूर येथील प्रसिद्ध मुश्ताकोद्दिन हार्डवेअर व कॅप्टन पेंट हाऊसचे मालक आहद ईनामदार यांचा नऊ वर्षीय मुलगा अरीब या चिमुकल्याने पवित्र रमजान महिन्यात आपल्या जीवनाचा पहिला रोजा पुर्ण केला. दिवसभर रोजा ठेवल्यानंतर या पहिल्या रोजा प्रित्यर्थ तीचा पुष्पहार घालून सूर्यस्तानंतर त्याचा रोजा खुलाई (इफ्तार) करण्यात आली. (म्हणजे उपवास सोडण्यात आला.) दिवसभर रोजा ठेवून व नमाज पठण करून दुआ केली. त्यामुळे त्यांच्या परिवारात उत्साहाचे वातावरण असून त्यांच्यावर सर्वत्र कौतूक होत आहे.

### गयाबाई नामदेव हांगे वृद्धपकाळाने ११० व्या वर्षी देवाज्ञा



**मुले, मुली व सुना, जावई, नातवंडे, पत्रुंड, चत्रुंड एवढ्या पाहिल्या**

**परळी । प्रतिनिधी**

गयाबाई नामदेव हांगे यांचे दि. ०१/०३/२०२६ रोजी वृद्धपकाळाने राहत्या घरी अंदाजे वयाच्या ११० व्या वर्षी देवाज्ञा झाली आहे. परळी तालुक्यातील वानटाकळी येथील रहिवासी असलेल्या गयाबाई नामदेव हांगे यांचे दि.०१ मार्च २०२६ रविवारी रात्री २.३० दरम्यान ११० व्या वर्षी राहत्या घरी वृद्धपकाळाने देवाज्ञा झाली आहे. त्या अत्यंत मनमिळावू , शांत, स्वभावाच्या होत्या, त्यांच्या जाण्याने गावात आणि आजूबाजूच्या परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. त्यांच्या पश्चात चार मुले आणि दोन मुली व सुना, जावई, नातवंडे, पत्रुंड, चत्रुंड असा त्यांचा मोठा परिवार आहे, गयाबाई नामदेव हांगे ह्या दै. अक्षर वार्ता चे संपादक संजय हांगे यांच्या आजी होत्या. सावडने- दिनांक ०३/०३/२०२६ सकाळी ७.३० वाजता परळी तालुक्यातील वानटाकळी या गावी होणार आहे.

### संस्कार मध्ये मराठी भाषा गौरव दिन उत्साहात संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

कविवर्य कुसुमाग्रज यांच्या जयंतीनिमित्त मराठी भाषा गौरव दिन अतिशय उत्साहात संस्कार विद्यालयातील इयत्ता पहिली दुसरी विभागात संपन्न झाला. या निमित्ताने सांस्कृतिक विभागाकडून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . प्रथमतः माननीय मुख्याध्यापक श्रीमती शोभाताई कुलकर्णी व माननीय विभाग प्रमुख विद्याताई पारगांवकर यांच्या हस्ते विद्येची देवता सरस्वती माता व कुसुमाग्रज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या वक्त्या सहकारी शिक्षिका श्रीमती कुलकर्णी डी यू यांनी कुसुमाग्रजांची ओळख करून देऊन त्यांची लेखन संपदेची माहिती सर्व विद्यार्थ्यांना दिली. त्यासोबतच श्रीमती आहीर जे आर यांनी विद्यार्थ्यांच्या आवडीच्या कविता गायन केल्या. श्री देशमुख सर यांनी कुसुमाग्रजांची 'कणा' ही कविता अतिशय प्रभावीरित्या गायनासह विद्यार्थ्यांना समजावली. शेवटी पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



बीड येथे पारंपारिक पद्धतीने होळी उत्साहात साजरी ; तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सहकुटुंब होलीकादर्शन करून शुभेच्छा दिल्या



हिंदू धर्मातील प्रमुख पवित्र सण होळीच्या निमित्ताने गावातील आपसातील हेवेदावे, मतभेद,राग द्वेष विसरून प्रेम,एकता बंधुभावाचा संदेश देणारा होळी आणि आपसात सामाजिक ऐक्य, बंधुभाव टिकवणारा धुलिवंदन सन.

# कार्यकर्त्यांनी सामाजिक जाणिवांची जपणूक करावी...

## शैक्षणिक विकासासाठी गट तट बाजूला ठेवावेत : आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या दुर्दैवी निधनामुळे माझा वाढदिवस साधेपणाने सामाजिक उपक्रम राबवून साजरा करावा असे आवाहन केल्यामुळे माजी सरपंच गंगाधर पडोळे यांनी गरजू शालेय विद्यार्थी विद्यार्थिनींना सायकल वाटप करून स्तुत्य उपक्रम राबवला आहे कार्यकर्त्यांनी अशाच प्रकारचे सामाजिक भान जपले पाहिजे आणि गावातील शैक्षणिक विकासासाठी गट तट बाजूला ठेवून एकत्र येऊन काम करण्याची आवश्यकता आहे असे प्रतिपादन आ.सुरेश धस यांनी केले.



केळसांगवी येथील माजी सरपंच गंगाधर पडोळे यांनी आ.सुरेश धस यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने अनावश्यक खर्च टाळून जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिकणाऱ्या गरजू विद्यार्थिनी आणि विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप केले आहे..

या सायकल वितरण समारंभामध्ये प्रमुख मार्गदर्शन करताना ते बोलत होते..

ते पुढे म्हणाले, माझ्या वाढदिवसाच्या उपक्रमामध्ये वाटपाच्या कोणत्याही कार्यक्रमांमध्ये मी स्वतः सहभागी होत नाही परंतु गरजू विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप करणे हा अत्यंत स्तुत्य उपक्रम असल्यामुळे मी या कार्यक्रमास उपस्थित आहे जिल्हा परिषदेच्या शाळा या गोरगरीब विद्यार्थ्यांचे मंदिर आहे आपण सुरुवातीपासूनच जिल्हा परिषद शिक्षण व्यवस्था अत्याधुनिक करण्यासाठी प्रयत्न केले असून गावोगावीच्या जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी शाळा खोल्या साठी निधी उपलब्ध करून दिलेला आहे तसेच जिल्हा परिषदेमार्फत शैक्षणिक गुणवत्ता अभियानासाठी विशेष प्रयत्न केल्यामुळे गुणवत्ता वाढ निश्चितपणे झालेली असून यापुढे आणखी दृश्य परिणाम दिसणार आहेत स्थानिक कार्यकर्त्यांनी गावातील शैक्षणिक वातावरण सुदृढ व्हावे यासाठी गट आणि तट ▶▶ उर्वरित पान २ वर

## धुलीवंदन साजरा करायला निघाले

## तरुणांच्या गाडीला अपघात; एक ठार, ३ जखमी

**बीड । प्रतिनिधी**

धुलीवंदन साजरा करायला निघालेल्या बीडमधील तरुणांच्या कारला भीषण अपघात झाल्याने एक जण जागीच ठार तर तिघे जखमी झाल्याची घटना बीड ते शिरूर रोडवर रायमोह जवळ घडली. कृष्णा मुळे असं अपघातात ठार झालेल्या तरुणाचे नाव आहे. कृष्णा हा आपल्या मित्रांसोबत



धुलिवंदनाचा सण साजरा करण्यासाठी वॉटर पार्कला जात होता. मध्यरात्री त्यांची गाडी बीड ते शिरूर रोडवरून जात असताना चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने ही गाडी रस्त्याच्या बाजूला पलटया खात थेट एका विहिरीच्या कठड्याला जाऊन धडकली. सुदैवाने ही गाडी विहिरीत कोसळली नाही.परंतु या भीषण अपघातात कृष्णा मुळे हा जागीच ठार झाला तर प्रसाद खोले, यश पेंढारे आणि अन्य एक जण यामध्ये जखमी झाले आहेत. या कारच्या पाठीमागे त्यांच्याच मित्रांची आणखी एक गाडी होती. त्या गाडीतील मित्रांनी जखमींना तातडीने बीड येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. कृष्णा मुळे यालाही तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र त्याचा मृत्यू झाला. कृष्णा मुळे याच्या इतर मित्रांवर सध्या उपचार सुरू आहेत.

## मातोश्री कॅम्पसमध्ये उत्साहात होळी दहन संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

मातोश्री बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, बीड यांच्या अंतर्गत असलेल्या 'मातोश्री कॅम्पस''काठोडा गाव ता.जि.बीड मध्ये अत्यंत उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने होळी दहन करण्यात आले. 'वाईट प्रवृत्तींचा नाश आणि चांगल्या विचारांची रुजवणूक' हा संदेश देत परिसरातील नागरिकांच्या आणि संस्थेच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## आदित्य एज्युकेशन ग्रुपचा जल्लोष १०.० वार्षिक स्नेहसंमेलन ५ ते १४ मार्च दरम्यान रंगणार

### विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव, संघभावना, आणि नेतृत्वगुणांचा विकास स्नेहसंमेलनातूनच होतो- डॉ. आदिती सारडा

**बीड । प्रतिनिधी**

शिक्षण क्षेत्रात नामांकित आदित्य एज्युकेशन ग्रुप, बीड अंतर्गत कार्यरत असलेल्या विविध महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने 'जल्लोष १०.०' हे भव्य, उत्साहपूर्ण, एकत्रित वार्षिक स्नेहसंमेलन ५ ते १४ मार्चदरम्यान, असे १० दिवस रंगणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणारे हे स्नेहसंमेलन उत्साह, स्पर्धा, कला, संस्कृती कार्यक्रमांचे अनोखे संमेलन ठरणार आहे. विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव देणे, संघभावना वाढवणे, त्यांच्यातील नेतृत्वगुणांचा विकास घडवण्याचे काम वार्षिक स्नेहसंमेलनातूनच होते. असे मत आदित्य शिक्षण संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सुभाषचंद्र सारडा यांनी व्यक्त केले.

आदित्य एज्युकेशन ग्रुपच्या स्नेहसंमेलनामध्ये क्रीडा, सांस्कृतिक, कला, मनोरंजनात्मक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. आदित्य एज्युकेशन ग्रुप अंतर्गत असलेल्या सर्व महाविद्यालयांतील विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी मोठ्या उत्साहाने या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

क्रीडा स्पर्धांची होणार रंगत- जल्लोष १०.० अंतर्गत विविध मैदानी व इनडोअर क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ▶▶ उर्वरित पान २ वर

## नांदूर घाट मध्ये घरकुल घोटाळा; युपी बिहार च्या लोकांनाही दिली घरकुल

**केज । प्रतिनिधी**

तालुक्यातील नांदूरघाट ग्रामपंचायती अंतर्गत मंजूर झालेल्या घरकुल योजनेत एक धक्कादायक गैरप्रकार समोर आला आहे. येथील ९ स्थानिक लाभार्थ्यांच्या हक्काची घरकुलाची रक्कम त्यांच्या खात्यात जमा न होता, चक्क बिहार आणि उत्तर प्रदेशातील व्यक्तींच्या बँक खात्यात जमा झाली आहे. या प्रकरणी दोषींवर फसवणुकीचे गुन्हे दाखल करण्याची मागणी ग्रामपंचायत सदस्य सोनाली अमोल जाधव आणि प्रा. सतीश मोराळे यांनी केली आहे. शनिवारी (दि. २८) झालेल्या ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीत हा मुद्दा उपस्थित करण्यात आला. सन २०२४ मध्ये मंजूर झालेल्या यादीतील ९ लाभार्थी हे परराज्यातील असून त्यांची नावे ना स्थानिक मतदार यादीत आहेत, ना ते येथील रहिवासी आहेत. तरीही त्यांच्या खात्यात पैसे जमा झाल्याचा आरोप सदस्यांनी केला आहे.बीड तालुक्यातील धावज्याची वाडी येथील याबरोबरच काटकरआडनावाच्या माय लेकरांना घरकुलाचा लाभ देण्यात आला. दोघेही नांदुर घाट चे रहिवासी नाहीत. युपी बिहार मधील संतोष कृष्णा कुमार, पिंटू दुधनाथ बिन, रंजन देवनारायण कुमार, राहुल कुमार मनजी , मानोन कुमार, पप्पू मुंशी मीयान, मोहम्मद इर्शाद अन्सारी, कुंदन छंदादीप कुमार यांच्या नावावर प्रत्येकी एक लाख वीस हजार रुपये देण्यात आले. स्थानिक गरिबांची फसवणूक करून शासनाचा निधी लाटणाऱ्यांवर कारवाई व्हावी, अशी आक्रमक भूमिका सदस्यांनी घेतली आहे. या संदर्भात ग्रामपंचायत अधिकारी भगवान शिरसाट▶▶ उर्वरित पान २ वर

## सांगवीत मुलांना सापडली अडीचशे चांदीची नाणी; उत्खननाची मागणी

**आष्टी । प्रतिनिधी**

घराच्या बांधकामासाठी उकरलेल्या मातीत ब्रिटिश कालीन चांदीची नाणी सांगवी पाटण मध्ये खेळणाऱ्या मुलांना सापडली. शनिवारी ही घटना उघडकीस येताच प्रशासनाने धाव घेऊन अडीचशे नाणी जप्त केली आहेत. जमिनीखाली आणखी साठा असण्याची शक्यता वर्तविली



जात आहे. सांगवी (पाटण) मध्ये शशिकांत नारायण खूटाळे यांच्या घराचे बांधकामासाठी पाया खणण्याचे काम सुरू होते. यातील मातीचा बाजूला ढिगारा केलेला असताना शनिवारी शाळा सुटल्यानंतर काही मुले या ढिगार्यावर खेळत बसली. यावेळी त्यांना एका गाडग्यामध्ये चांदीची नाणी सापडली ती त्यांनी खिशातही भरली. ही बाब मालकाच्या लक्षात येताच मुलांना दमदाटी करून ती नाणी काढून घेतली. यामुळे सगळ्या गावात या घटनेची चर्चा रंगली. ही बाब प्रशासनाच्या कानावर गेल्यानंतर घटनास्थळी धाव घेतली गेली. पहिल्या दिवशी प्रशासनाने ९८ तर दुसऱ्या दिवशी १५२ नाणी जप्त करण्यात आली. हि नाणी ब्रिटिश कालीन असून १९४१ असा नाण्यांवर उल्लेख करण्यात आलेला आहे. जप्त करण्यात आलेली ही अडीचशे नाणी शुद्ध चांदीची असल्याचं सांगितलं जात आहे. या जागेत आणखी मोठा खजिना असण्याची शक्यता वर्तविली जात असून पुरातत्व विभागाने या ठिकाणी उत्खनन करावे अशी मागणी केली जात आहे.